**जलयुक्त शिवार अभियान हा कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी तसेच तत्सम इतर कार्यक्रमांमध्ये अशासकीय संस्थांचा सहभाग (NGO) घेण्याबाबत.**

# महाराष्ट्र शासन
## जलसंधारण विभाग
**शासन परिपत्रक क्र: मफुअ -२०१६/प्र.क्र. ६८ /जल-८**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: ४ मे, २०१६

**प्रस्तावना -**

राज्यात राबविण्यात येत असलेल्या जलयुक्त शिवार अभियान हा महत्वाकांक्षी कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी सदर कार्यक्रमामध्ये अशासकीय संस्थांचा सहभाग (NGO) घेण्याबाबतच्या विषयावर चर्चा करण्यासाठी मा.मुख्यमंत्री महोदयाच्या अध्यक्षतेखालील दिनांक ३ मार्च २०१६ रोजी बैठक पार पडली. जलयुक्त शिवार अभियानातंर्गत मोठया प्रमाणात नाला खोलीकरण/ रुंदीकरण करण्याचे काम करण्यात येत असून सदरचे काम शासकीय यंत्रणेबरोबरच लोकसहभागातून देखील करण्यात येत आहे. त्याच प्रमाणे जलयुक्त शिवार मधील गांवा व्यतिरिक्त इतर ठिकाणी देखील अशा स्वरुपाची कामे घेण्यात येत आहेत. नदी /नाला/ओढा खोलीकरण रुंदीकरणाच्या **कामाबरोबरच** Deep CCT **करणे, शेततळी, डोह यामधील गाळ काढणे इत्यादी कामे** लोकसहभागातून / अशासकीय संस्थाना CSR च्या माध्यमातून उपलब्ध होणाऱ्या निधी मधून करण्यात येत असल्याने अशा कामांकरीता, राष्ट्रीय कृषि विकास योजनेतंर्गत महात्मा ज्योतीबा फुले जलभुमी संधारण अभियान या योजनेखाली प्राप्त होणाऱ्या अनुदानातून तसेच जिल्हानियोजन विकास समितीकडे उपलब्ध असलेल्या Gap Funding च्या निधीमधून त्याच प्रमाणे नाविण्यपुर्ण योजनांकरीता राखून ठेवलेल्या ३.५ टक्के निधीमधून यंत्रे / वाहने यासाठी होणाऱ्या डीझेलच्या खर्चाकरीता निधी उपलब्ध करुन सूचना देण्याबाबत प्रस्ताव विचाराधिन होता.

## शासन परिपत्रक -

राज्यात राबविण्यात येत असलेल्या जलयुक्त शिवार अभियान हा महत्वाकांक्षी कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत असून, अभियानातंर्गत मोठया प्रमाणात नाला खोलीकरण/ रुंदीकरण करण्याचे काम करण्यात येत आहे. त्याच प्रमाणे जलयुक्त शिवार मधील गांवा व्यतिरिक्त इतर ठिकाणी देखील अशा स्वरुपाची कामे घेण्यात येत आहेत. सदरचे काम शासकीय यंत्रणेबरोबरच लोकसहभागातून देखील करण्यात येत आहे. या नदी /नाला/ओढा खोलीकरण रुंदीकरणाच्या कामाबरोबरच Deep CCT करणे , शेततळी, डोह यामधील गाळ काढणे इत्यादी **कामे** लोकसहभागातून / अशासकीय संस्थाना CSR च्या माध्यमातून उपलब्ध होणाऱ्या निधी मधून करण्यात येत असल्याने अशा कामांकरीता, राष्ट्रीय कृषि विकास योजनेतंर्गत महात्मा ज्योतीबा फुले जलभुमी संधारण अभियान या योजनेखाली प्राप्त होणाऱ्या अनुदानातून तसेच जिल्हानियोजन विकास समितीकडे उपलब्ध असलेल्या Gap Funding च्या निधीमधून त्याच प्रमाणे नाविण्यपुर्ण योजनांकरीता राखून ठेवलेल्या ३.५ टक्के

निधीमधून यंत्रे / वाहने यासाठी होणाऱ्या डीझेलच्या खर्चाकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने यापूर्वीच सूचना दिलेल्या आहेत.

वरील कामांपैकी नाला खोलीकरण/रुंदीकरण ही कामे लघु सिंचन (जलसंधारण), जिल्हा परिषद ( लघुसिंचन ) जलसंपदा व कृषि विभागामार्फत त्या त्या जिल्हास्तरावर घेण्यात आलेल्या निर्णयानुसार करण्यात येत असून **Deep CCT करणे ,** शेततळी, डोह यामधील गाळ काढणे ही कामे लघु सिंचन ( जलसंधारण ), कृषि विभाग व जिल्हा परिषद यांचे मार्फत करण्यात येत आहेत. या कामांबाबत संबंधीत अशासकीय संस्था यांना डिझेल करीता निधी देणेबाबत खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

(१) कार्यकारी अभियता यांत्रिकी विभाग , सातारा यांनी वेगवगळया मशिन वापरुन प्रती तास किती गाळ काढण्यात येतो व डिझेलसाठी प्रती लिटर किती रक्कम दयावी लागेल याबाबतचे विवरणपत्र माहितीसाठी सोबत जोडून पाठविण्यात येत आहे. सदर विवरणपत्राचे उदाहरण म्हणून वापरण्यात यावे व सर्व जिल्ह्यानी आप आपल्या जिल्ह्यात विविध मशिनद्वारे प्रती तास किती गाळ काढण्यात येतो व प्रती लिटर डिझेलसाठी किती रक्कम देय राहील हया बाबी प्रत्यक्ष तपासून प्रती लिटर डिझेलसाठी दयावयाच्या दरास जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीची मान्यता घेण्यात यावी.

(२) खोल सलग समतलचर (Deep CCT) करण्यासाठी विविध मशिनव्दारे प्रति तास किती घनमीटर माती/गाळ काढण्यात येतो. तसेच प्रति घनमीटर किती डिझेल लागते या बाबी तपासून प्रति घनमीटर डिझेलसाठी दयावयाच्या दराबाबत सर्व जिल्हयांना तपशीलवार मार्गदर्शक सूचना संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन यांचेकडून निर्गमित करण्यात याव्यात.

वरिल प्रमाणे निदेशानूसार नाला खोलीकरण / रुंदीकरणाबाबत, डोह यामधील गाळ काढणे याबाबत तपशिलवार मार्गदर्शक सूचना मुख्य अभियंता, लघु सिंचन जलसंधारण, महाराष्ट्र राज्य पुणे व मुख्य अभियंता विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम नागपूर यांनी एकत्रिपणे व **Deep CCT करणे ,** शेततळी, याबाबत तपशिलवार मार्गदर्शक सूचना संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन यांचेकडून निर्गमित करण्यात याव्यात.

सदर शासन परिपत्रक शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१६०५०४१७५१०५३०२६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vinod S Wakhare

Digitally signed by Vinod S Wakhare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=8f4277e1c48d95adb75a5d959bbb8f12b6189 2a0bf91d9d7250d0bfd4f204c77, cn=Vinod S Wakhare
Date: 2016.05.07 12:36:30 +05'30'

**(वि.सि.वखारे)**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव,

२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,
३. मा.विरोधी पक्षनेते विधान परिषद व विधानसभा यांचे सचिव,
४. मा.मंत्री (जलसंधारण), यांचे खाजगी सचिव
५. मा.राज्यमंत्री, (जलसंधारण) याचे खाजगी सचिव
६. सर्व मा.मंत्री, राज्यमंत्री याचे खाजगी सचिव,
७. कार्याध्यक्ष, आदर्शगांव संकल्प व प्रकल्प समिती,
८. मुख्य सचिव यांचे सहसचिव,
९. सर्व अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालयीन विभाग,
१०. प्रधान सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
११. सर्व विभागीय आयुक्त,
१२. आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे,
१३. सर्व जिल्हाधिकारी,
१४. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
१५. संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१६. सर्व संचालक, कृषि आयुक्तालय, पुणे,
१७. मुख्य अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर), पुणे
१८. प्रधान मुख्य वनसंरक्षक व संचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१९. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे,
२०. सर्व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
२१. सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
२२. सर्व उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय ( सर्व),
२३. सर्व विभागीय कृषि सहसंचालक,
२४. सर्व अधीक्षक अभियंता, पाटबंधारे/ सर्व अधीक्षक अभियंता, लघु पाटबंधारे, (स्थानिक स्तर)
२५. संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई,
२६. महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई (प्रसिध्दीकरीता ),
२७. सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,
२८. सर्व मुख्य वन संरक्षक व उपसंचालक, सामाजिक वनीकरण वृत्ते,
२९. सर्व सहसंचालक, सामाजिक वनीकरण वृत्ते,
३०. सर्व मुख्य वनसंरक्षक,/ सर्व उपवनसंरक्षक,
३१. वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,
३२. महाराष्ट्र राज्य जलसंधारण सल्लागार परिषदेचे सर्व अशासकीय सदस्य,
३३. महालेखापाल, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य १ व २, मुंबई व नागपूर,
३४. महालेखापाल, (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य १ व २, मुंबई व नागपूर,
३५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
३६. सर्व मंत्रालयीन विभाग,

३७. कृषि व पदुम विभाग (राकृवियो कक्ष), मंत्रालय, मुंबई
३८. संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
३९. सर्व उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, जलसंधारण विभाग, (जलसंधारण उप विभाग), मंत्रालय, मुंबई
४०. जल-८ (निवड नस्ती), ग्रा.वि.व ज.सं.विभाग, मंत्रालय, मुंबई

Satara
33/5

# Machinewise Fuel Consumption Statement

## Base - Executive Engineer Mechanic Department, Satara.

| Sr. No. | Name & Serial No. Of Machine | Standard Life in Hr/Kms | Class of M/C | Standard Fuel Cons. Lt. /Hr. Or Lt./Kms | Prodution Capasity Per Hr in Cubic Mtr. | Fuel Cons. in Ltr/Cubic Mtr. | Desiltation in cubic Mtr./Ltr. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| A | **Excavators** | | | | | | |
| 1 | Tata Hitachi EX 120 Excavator No.052305 | 15000 | A | 8 | 50 | 0.16 | 6.25 |
| 2 | Tata Hitachi EX 120 Excavator No.052306 | 15000 | A | 8 | 50 | 0.16 | 6.25 |
| 3 | Tata Hitachi EX 120 Excavator No.052307 | 15000 | A | 8 | 50 | 0.16 | 6.25 |
| 4 | Tata Hitachi EX 120 Excavator No.052308 | 15000 | A | 8 | 50 | 0.16 | 6.25 |
| 5 | Tata Hitachi EX 200 Excavator No.2001-8676 | 15000 | A | 14 | 61 | 0.23 | 4.36 |
| 6 | Tata Hitachi EX 200 Excavator No.9929 | 15000 | A | 14 | 61 | 0.23 | 4.36 |
| 7 | Tata Hitachi LC 70 Excavator No.703-4912 | 15000 | A | 6 | 22 | 0.27 | 3.67 |
| 8 | Tata Hitachi LC 70 Excavator No.703-4945 | 15000 | A | 6 | 22 | 0.27 | 3.67 |
| 9 | JCB JS 80 Excavator No. 81406220 | 15000 | A | 7 | 22 | 0.32 | 3.14 |
| 10 | Terex 72-21 wheeled Loader (Black-Hoe)No.2702 | 15000 | D | 10 | 30 | 0.33 | 3.00 |
| 11 | Terex 72-21 wheeled Loader (Black-Hoe)No.2224 | 15000 | D | 10 | 30 | 0.33 | 3.00 |
| B | **Wheeled Loader** | | | | | | |
| 12 | Fiat Allis 745-C Wheel Loader No. 3783 | 15000 | D | 20 | 128 | 0.16 | 6.40 |
| 13 | Terrex 72-21 Wheel Loader No.2026 | 15000 | D | 14 | 109 | 0.13 | 7.79 |
| 14 | Terrex 72-21 Wheel Loader No.2226 | 15000 | C | 14 | 109 | 0.13 | 7.79 |
| C | **Crawler Tractors (Dozers)** | | | | | | |
| 15 | Caterpillar D8K 66 V Dozer No.4405 | 16000 | D | 35 | 100 | 0.35 | 2.86 |
| 16 | Caterpillar D8K 66 V Dozer No.4404 | 16000 | D | 35 | 100 | 0.35 | 2.86 |
| 17 | Caterpillar D8K 77 V Dozer No.18398 | 16000 | C | 35 | 80 | 0.44 | 2.29 |
| 18 | Caterpillar D8H 68A Dozer No.1553 | 12000 | D | 25 | 80 | 0.31 | 3.20 |
| 19 | Caterpillar D7G Dozer No.4257 | 12000 | D | 19 | 60 | 0.32 | 3.16 |
| 20 | Caterpillar D4E Dozer No.847 | 9000 | D | 8 | 25 | 0.32 | 3.13 |
| 21 | Shantui SD 13AA Dozer No. 102466 | 12000 | A | 12 | 60 | 0.20 | 5.00 |
| 22 | Caterpillar D3B Dozer No. 1460 | 9000 | C | 7 | 22 | 0.32 | 3.14 |
| 23 | Caterpillar D3B Dozer No. 1479 | 9000 | B | 7 | 22 | 0.32 | 3.14 |
| 24 | Caterpillar D3 (79U) Dozer No. 2769 | 9000 | B | 6 | 22 | 0.27 | 3.67 |
| 25 | Caterpillar D3 (79U) Dozer No. 2794 | 9000 | B | 6 | 22 | 0.27 | 3.67 |
| 26 | Caterpillar D3 (79U) Dozer No. 2855 | 9000 | B | 6 | 22 | 0.27 | 3.67 |
| 27 | Caterpillar D3 (79U) Dozer No. 2866 | 9000 | B | 6 | 22 | 0.27 | 3.67 |
| 28 | Caterpillar D3 (79U) Dozer No. 2968 | 9000 | B | 6 | 22 | 0.27 | 3.67 |
| 29 | Jonh Dear 550B Dozer No. 734864 | 9000 | A | 7 | 22 | 0.32 | 3.14 |
| 30 | BEML D-155 A-1 Dozer No.064 | 16000 | B | 30 | 100 | 0.30 | 3.33 |
| 31 | BEML D-155 A-1 Dozer No.21076 | 16000 | A | 30 | 100 | 0.30 | 3.33 |
| | | | | | | 8.24729864 | 129.07 |
| | | | | | average | 0.27 | 4.16 |

0.27 x 55 = 14.85/m³